# ओएनजीसी (डब्ल्यूओयू) कर्मचारी संघटना

( एकमेव मान्यताप्राप्त युनियन ) दि. 23/1/2017

मित्रहो,

11 हाय येथिल पाईप लाईन सेक्शनमध्ये ऑफशोअरमधील पिगींग चे काम करण्याकरीता PLS या दुबईतील कंपनीला Contract देण्यात आलेले असून सदर कॉन्ट्रक्टर येथिल स्थानीक कामगार घेवून हे कॉन्ट्रक्ट चालवित आहे. या कॉन्ट्रक्टरला ओएनजीसीकडून या कामाचे भरपूर पैसे मिळत असताना देखिल हा कॉन्ट्रक्टर ऑफशोअरमध्ये कष्ट करणाऱ्या आपल्या कामगारांना वेळच्या वेळी पगार देत नव्हता. या कामगारांचा सहा महिन्याचा पगार या कॉन्ट्रक्टरने थकविल्यामुळे आपल्या कुटूंबियांची उपासमार होत असल्याची पाहून या कामगारांनी आपला थकलेला पगार मिळावा यासाठी शक्य त्या सर्व ठिकाणी प्रयत्न केले. अगदी पंतप्रधान कार्यालयात देखिल त्यांनी पत्रव्यवहार करुन आपली व्यथा मांडण्याचा प्रयत्न केला. मात्र कोठेच प्रतिसाद न मिळाल्यामुळे या कामगारांनी मा. श्री. प्रदीप मयेकर यांची भेट घेवून आपली समस्या त्यांच्यापूढे मांडली. मा.श्री. प्रदीप मयेकर व कर्मचारी संघटनेच्या इतर पदाधिकाऱ्यांनी I/c Pipe Line तसेच संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेवून या गंभीर समस्येची अत्यंत सडेतोडपणे जाणिव करुन या कामगारांचा थकीत पगार दण्याविषयी विनंती केली. सदर अधिकाऱ्यांनी देखील या कॉन्ट्रक्टरला Blacklisted करुन कॉन्ट्रक्टरच्या बँक गॅरंटी मधून व त्याच्या बीलामधून या कामगारांचा थकीत पगार देण्याचे मान्य केले.

कर्मचारी संघटनेच्या मॅनेजमेंटसोबत झालेल्या मिटींगला चार महिने होवून गेले तरीदेखील या कामगारांना पगारातील एक पैसासुध्दा मिळाला नव्हता. म्हणजे हे कामगार आता 10 महिन्यापासून आपल्या हक्काच्या पगारापासून वंचीत तर होतेच शिवाय हा कॉन्ट्रक्टर या कामगारांचे पास देखील रद्द करीत नसल्यामुळे हे कामगार ओएनजीसीमध्येच दुसऱ्या कॉन्ट्रक्टरकडेही काम करु शकत नव्हते. यामुळे हे कामगार हतबल झाले होते. एकीकडे ओएनजीसी ही महारत्न म्हणून सन्मानाने स्वत:ला मिरवत असताना तसच कंत्राटी कामगारांसाठी समाधानकारक वेतन मिळावे यासाठी ओएनजीसीने Fair Wage Policy चे धोरण अंगिकारीत असताना हा सारा प्रकार ओएनजीसीसाठी अशोभनीय असा होता.

कर्मचारी संघटनेने मा. डायरेक्टर (ऑफशोअर) यांना पत्र लिहून हा सारा प्रकार कळविल्यानंतर त्यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेवून त्वरीत कारवाई केली त्यामुळे कर्मचारी संघटनेने मा. डायरेक्टर (ऑफशोअर) यांना पत्र लिहिल्यापासून केवळ सात दिवसातच या कामगारांचा थकलेला सर्व पगार तातडीने मिळाला. याच कामगारांच्या एका टीमला पुन्हा ऑफशोअरमध्ये तातडीने पाठविण्यातही आले. या कामगारांचा पगार होत नसल्याने सप्टें. 2016 पासून या कामगारांना ऑफशोअरमधून उतरविले होते व यामुळे पाईप लाईनचे सर्व काम तेव्हापासून बंद झाले होते. या कामगाारांना एकरक्कमी लाखापेक्षाही जास्त रक्कम मिळाल्यामुळे समाधानी झालेले हे सर्व कामगार व त्यांचे कुटूंबीय कर्मचारी संघटनेचे मनापासून आभार मानीत आहेत.

हे कंत्राटी कामगार कर्मचारी संघटनेचे सभासद नाहीत किंवा त्यांना मतदानाचा अधिकारही नाही. त्याचप्रमाणे दूरदूरपर्यंत या कामगारांचा कर्मचारी संघटनेशी काही संबंधही नाही. आज सार्वजनिक क्षेत्रात किंवा कामगार क्षेत्रात संधीसाधू नेते मेलेल्या माणसाच्या टाळूवरील लोणी खात असल्याची उदाहरणे आपल्या समोर असताना आपली सर्वांची कर्मचारी संघटना चाकोरीच्या बाहेर जावून पिडीत, शोषीत कर्मचाऱ्यांना निस्वार्थपणे मदत करीत आहे याचा आपणा सर्वांना अभिमान वाटावा यासाठी हा पत्रप्रपंच.

धन्यवाद !

**कामगार एकता झिंदाबाद ! कर्मचारी संघटना झिंदाबाद !!**

**अध्यक्ष : प्रकाश दळवी** **सरचिटणीस : प्रदीप मयेकर**